लोकमत

आता 'कास्ट व्हॅलिडिटी' मिळेल ई-मेलवर

'बार्टी'चा पुढाकार : जातवैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीपुढे येण्याची गरज नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

अमरावती : शासनाने मंगळवारपासून 'कास्ट व्हॅलिडिटी' ऑनलाईन प्रक्रिया सुरु केली आहे. पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) यांच्या नियंत्रणात ही प्रणाली कार्यरत असणार आहे. त्यामुळे आता उमेदवारांना जातवैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीपुढे येण्याची गरज नाही.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने काही महिन्यांपूर्वी 'कास्ट व्हॅलिडिटी' प्रक्रिया ऑनलाईन करण्याची घोषणा केली होती. ना. धनंजय मुंडे यांनी चांद्यापासून बांद्यापर्यंत 'कास्ट व्हॅ एकूणच प्रक्रिया ऑनलाईन करण्याविषयी वारंवार बैठकी घेतल्या. परिणामी लॉकडाऊन शिथिल होताच जातवैधता प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया ऑनलाईन सुरु झाली आहे. मंगळवारी पहिल्या दिवशी अमरावती येथे एक अर्ज ऑनलाईन भरण्यात आला. एससी, ओबीसी,

असा करावा लागेल अर्ज

बार्टीच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज केल्यानंतर 'कास्ट व्हॅलिडिटी' ही पीडीएफ ई-मेलद्वारे प्राप्त होईल. शुल्कदेखील ऑनलाईन भरावे लागेल. कागदपत्रे पडताळणीची गरज असणार नाही. उमेदवारांना प्रकरण कोणत्या स्तरावर आहे, हे ऑनलाईन बघता येणार आहे. रक्तसंबंधाचा जाहीरनामासुद्धा ऑनलाईन सादर करावा लागणार आहे.